महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन उपक्रम)
सीआयएन : यु४०१०९एमएच२००५एसजीसी१५३६४५

दुरध्वनी क्र.२६४७४७५३ (वै)/२६४७४२११ (का)
फॅक्स क्र. २६४७२३६६
ईमेल : cecomm@mahadiscom.in
संकेतस्थळ : www.mahadiscom.in

प्लॉट क्र. जी-९, प्रकाशगड
प्रो. अनंत काणेकर मार्ग,
वांद्रे (पूर्व)
मुंबई- ४०० ०५१

**क्र. पीआर-३/मुख्यमंत्री कृषी संजीवनी-२०१७/२६६४२** **दिनांक :०१.११.२०१७**

# वाणिज्य परिपत्रक क्र.२९४

**विषय:** **कृषी ग्राहकांकडील वीज बिल थकबाकीमध्ये सवलत देण्यासाठी "मुख्यमंत्री कृषी संजीवनी योजना २०१७ ".**

**संदर्भ:** शासन निर्णय क्र.कृसंयो-२०१७/प्र.क्र.४२५/ऊर्जा-५, दि.३१.१०.२०१७.

कृषीपंपधारक ग्राहकांची आर्थिक स्थिती तसेच कृषी ग्राहकांच्या वीज बिलांचा भरणा करण्याचे अत्यल्प प्रमाण पाहता कृषीपंप ग्राहकांना थकबाकीमध्ये सवलत देण्याकरीता शासनाने संदर्भातील निर्णयानुसार "मुख्यमंत्री कृषी संजीवनी योजना २०१७ " राबविण्याचा निर्णय घेतलेला आहे.

"मुख्यमंत्री कृषी संजीवनी योजना २०१७ " ची ठळक वैशिष्टे खालीलप्रमाणे आहेत.

१) राज्यातील सर्व कृषीपंपधारक उपसा जलसिंचन योजनेसहित या योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी पात्र राहतील.

२) जून, २०१७ चे त्रैमासिक चालू वीज देयके दि.१५ नोव्हेंबर २०१७ पूर्वी भरुन हया योजनेत सहभागी होता येईल. योजनेमध्ये सहभागी न होणाऱ्या कृषी ग्राहकांकडून नियमाप्रमाणे थकबाकी वसुली करण्यात येईल.

३) दि.३१ मार्च २०१७ अखेरीस असलेली वीज बिलाची मुळ थकबाकी रक्कम खालीलप्रमाणे हप्त्यात भरावयाची मुभा राहील.

(अ) ग्राहकांची मुळ थकबाकी रु.३०,००० पेक्षा जास्त असल्यास ती १० समान हप्त्यांमध्ये प्रत्येक दिड महिन्याच्या कालावधीमध्ये भरणा करणे आवश्यक राहील. (उदाहरण सोबतच्या तक्ता क्र.१ मध्ये जोडलेले आहे.)

(ब) मुळ थकबाकी रु.३०,००० पेक्षा कमी असल्यास ती ५ समान हप्त्यांमध्ये प्रत्येक तीन महिन्याच्या कालावधीमध्ये भरणा करणे आवश्यक राहील. (उदाहरण सोबतच्या तक्ता क्र.२ मध्ये जोडलेले आहे.)

४) ज्या प्रमाणात दहा / पाच समान हप्ते कृषी ग्राहक वेळेवर भरतील त्याच प्रमाणात कृषीपंप ग्राहकांचे व्याज व दंडनीय आकार माफ करण्याबाबत शासनातर्फे विचार करण्यात येईल.

५) सदर योजनेचा पूर्ण फायदा घेण्याकरीता माहे मार्च २०१७ अखेरची मुळ थकबाकी दि.३१ डिसेंबर, २०१८ पूर्वी दिलेल्या मुदतीत चालू देयकासहीत भरणे बंधनकारक राहील.

६) योजनेत सहभागी झालेल्या कृषी ग्राहकांना १ एप्रिल २०१७ नंतरची सर्व चालु वीज बिले पूर्णपणे भरणा करणे आवश्यक आहे.

७) ज्या कृषी ग्राहकाने योजनेत सहभाग घेतला नाही अथवा योजने अंतर्गत ठरविण्यात आलेली रक्कमेचा भरणा केला नाही अशा कृषी ग्राहकांना योजनेकरीता अपात्र ठरविण्यात येईल तसेच ग्राहकांकडून व्याज व दंडासहीत पुर्ण रक्कमेची थकबाकी वसुली नियमाप्रमाणे करण्यात येईल.

सदर योजनेची परिणामकारक अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने सर्व क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी प्रसिध्दी माध्यमाद्वारे "मुख्यमंत्री कृषी संजीवनी योजना २०१७ " ला व्यापक प्रसिध्दी दयावी.

- योजने अंतर्गत शेतकऱ्यांच्या वीज देयकांचा भरणा करण्याच्या सोईसाठी माहे नोव्हेंबर २०१७ मध्ये शाखास्तरावर प्रत्येक आठवडयात शिबीर आयोजित करण्यात येतील.
- सर्व क्षेत्रिय कार्यालयांनी अनधिकृत वीज जोडणीद्वारे वीज वापर करणाऱ्या विरुध्द धडक मोहिम राबविण्यात यावी.
- तसेच प्रत्येक कृषी ग्राहकांची पुढील तिमाहीची विद्युत देयके ग्राहकांना वितरीत केल्यानंतर प्रत्येक आठवडयात सर्व उपविभागीय स्तरावर शिबीरे घेण्यात येतील. कृषी ग्राहकांना ऑनलाईन, मोबाईल ॲपद्वारे वीज बिल भरण्याबाबत अवगत व प्रोत्साहीत करण्यात यावे.
- विद्युत पुरवठा चालु असलेल्या कृषी ग्राहकांचा वीज पुरवठा दिनांक १५ नोव्हेंबर २०१७ पर्यंत खंडीत करु नये. विद्युत पुरवठा चालु असलेल्या कृषी ग्राहकाने सदर योजनेत भाग न घेतल्यास दिनांक १५ नोव्हेंबर २०१७ नंतर विद्युत पुरवठा खंडीत करण्यात येईल.

सदर योजना यशस्वीरित्या राबविल्यास शेतकऱ्यांवरील वीज बिलाच्या थकबाकीचा बोजा कमी होईल व महावितरणच्या थकबाकीची वसुली सुध्दा होईल. वरील मार्गदर्शक तत्वाच्या आधारे "मुख्यमंत्री कृषी संजीवनी योजना २०१७ " ची परिणामकारक अंमलबजावणी होईल याबाबत सर्व क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी सर्वतोपरी प्रयत्न करावे.

दि. ११.१७

**मुख्य अभियंता (वाणिज्य)**

**<u>प्रत सविनय सादर:</u>**

कार्यकारी संचालक (माहिती तंत्रज्ञान व ग्राहक सेवा)

--- सदर योजनेत सहभागी होणाऱ्या कृषी ग्राहकांची विद्युत देयके भरणा करण्यासाठी महावितरणच्या संकेत स्थळावर व्यवस्था करावी. (www.mahadiscom.in)

**प्रत रवाना: प्रेषण यादीप्रमाणे.**

**(उदाहरण तक्ता क्र.1)**

मार्च 2017 अखेर मुळ थकबाकी रु.30,000/- पेक्षा जास्त असल्यास

| | | | |
|---|---|---|---|
| 1) | मुळ थकबाकी | : रु. 30,600/- | |
| 2) | व्याज | : रु. 19,200/- | |
| 3) | दंड | : रु. 600/- | |
| 4) | एकूण थकबाकी | : रु. 50,400/- | (31 मार्च 2017 अखेरीस) |
| 5) | चालू देयक | : रु. 2,200/- (जून तिमाहीसाठी) | |

चालू देयक - रु. 2,200/- असेल तर हया योजनेत सहभागी होण्यासाठी भरावयाची रक्कम व तारीख :

| | | | |
|---|---|---|---|
| 1) 15 नोव्हेंबर 2017 पूर्वी | : रु. 2,200/- | 2) 15 नोव्हेंबर 2017 पूर्वी | : रु.3,060/- |
| 3) 31 डिसेंबर 2017 पूर्वी | : रु. 3,060/- | 4) 15 फेब्रुवारी 2018पूर्वी | : रु.3,060/- |
| 5) 31 मार्च 2018 पूर्वी | : रु. 3,060/- | 6) 15 मे 2018 पूर्वी | : रु.3,060/- |
| 7) 30 जून 2018पूर्वी | : रु. 3,060/- | 8) 15ऑगस्ट 2018 पूर्वी | : रु.3,060/- |
| 9) 30 सप्टेंबर 2018पूर्वी | : रु. 3,060/- | 10) 15 नोव्हेंबर 2018 पूर्वी | : रु.3,060/- |
| 11) 31 डिसेंबर 2018 पूर्वी` | : रु. 3,060/- | | |

या सोबतच वीज ग्राहकांनी चालू वीज देयके भरणे क्रमप्राप्त आहे.
कृषी ग्राहकांना मिळणारी माफी रु.19,200/- + रु.600/- अशी एकूण रु.19,800/-)

**(उदाहरण तक्ता क्र.2)**

मार्च 2017 अखेर मुळ थकबाकी रु.30,000/- पेक्षा कमी असल्यास

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1) | मुळ थकबाकी | : | रु. 12,500/- | |
| 2) | व्याज | : | रु. 9,500/- | |
| 3) | दंड | : | रु. 500/- | |
| 4) | एकूण थकबाकी | : | रु. 22,500/- | (31 मार्च 2017 अखेरीस) |
| 5) | चालू देयक | : | रु. 2,200/- (जून तिमाहीसाठी) | |

चालू देयक - रु. 2,200/- असेल तर हया योजनेत सहभागी होण्यासाठी भरावयाची रक्कम व तारीख :

| | | | |
|---|---|---|---|
| 1) | नोव्हेंबर 2017 | : | रु. 2,200/- |
| 2) | डिसेंबर 2017 | : | रु. 2,500/- |
| 3) | मार्च 2018 | : | रु. 2,500/- |
| 4) | जून 2018 | : | रु. 2,500/- |
| 5) | सप्टेंबर 2018 | : | रु. 2,500/- |
| 6) | डिसेंबर 2018 | : | रु. 2,500/- |

या सोबतच वीज ग्राहकांनी चालू वीज देयके भरणे क्रमप्राप्त आहे.
कृषी ग्राहकांना मिळणारी माफी रु.9,500/- + रु.500/- अशी एकूण रु.10,000/-)